


# अरुणिमा सिन्हा

## जगातील पहिली दिव्यांग महिला पर्वतारोहक



अरुणिमा सिन्हा या जगातील पहिल्या दिव्यांग महिला पर्वतारोहक आहेत ज्यांनी माउंट एव्हरेस्ट सर केले. एका भीषण रेल्वे अपघातात त्यांना पाय गमवावा लागला, पण त्या पराभूत झाल्या नाहीत. कृत्रिम पाय लावूनही त्यांनी जगण्याचा नवा मार्ग शोधला. अपार जिद्द, इच्छाशक्ती आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी अशक्य ते शक्य करून दाखवले. 2013 मध्ये त्यांनी एव्हरेस्ट शिखर सर करून इतिहास रचला. त्यानंतर त्यांनी किलिमांजारो, एल्ब्रुस, कोस्चुश्को अशा जगातील उंच शिखरांवर यशस्वी चढाई केली. अपंगत्व हे कधीही यशाच्या आड येऊ शकत नाही हे त्यांनी सिद्ध केले. त्यांची जीवनकथा संघर्ष, धैर्य आणि चिकाटी यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे. अनेक महिलांसाठी आणि युवांसाठी त्या आजही प्रेरणेचा दीपस्तंभ ठरल्या आहेत. त्यांचे वाक्य – **‘अडथळे आपल्याला थांबवण्यासाठी नसतात, तर अधिक मजबूत बनवण्यासाठी असतात.’** – आज लाखोंना जगण्याचा नवा आत्मविश्वास देते.



# डॉ. टेसी थॉमस

## भारताची मिसाइल वुमन



डॉ. टेसी थॉमस या भारताच्या नामांकित वैज्ञानिक असून त्यांना **‘मिसाइल वुमन ऑफ इंडिया’** म्हणून ओळखले जाते. त्या DRDO मध्ये महत्त्वाच्या पदावर कार्यरत राहिल्या आणि अग्नि IV क्षेपणास्त्र प्रकल्पाचे नेतृत्व केले. त्या क्षेपणास्त्र प्रकल्पाचे नेतृत्व करणाऱ्या भारतातील पहिल्या महिला होत्या आणि त्यांनी अग्नि-V सारख्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पांमध्येही योगदान दिले. लहानपणापासूनच विज्ञानाची आवड आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी यश मिळवले. त्यांनी अभियांत्रिकी शिक्षण घेतल्यानंतर संरक्षण संशोधनात कारकीर्द सुरू केली. अनेक वर्षांच्या संशोधनातून त्यांनी भारताच्या क्षेपणास्त्र तंत्रज्ञानाला नवे बळ दिले. पुरुषी वर्चस्व असलेल्या क्षेत्रात त्यांनी महिलांसाठी आदर्श निर्माण केला आहे. त्यांची दूरदृष्टी, आत्मविश्वास आणि नेतृत्वामुळे भारताने संरक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण प्रगती साधली. त्या आजही भारतीय युवांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत.









# विमला बहुगुणा

## चिपको आंदोलनातील नेत्या

विमला बहुगुणा सर्वोदयी कार्यकर्त्या होत्या आणि 1953 ते 55 दरम्यान बिहारमध्ये झालेल्या भूदान चळवळीत त्यांचा सक्रीय सहभाग होता. ग्रामीण भागतल्या लहान मुलांचं शिक्षण तसंच महिलांना स्वावलंबी करण्याचं कार्य त्यांनी केलं. चिपको आंदोनलाचे नेते सुंदरलाल बहुगुणा त्यांचे पती होते. हिमालयातील जंगलतोड थांबवण्यासाठी करण्यात आलेल्या चिपको आंदोलनात त्यांची सक्रिय भूमिका होती. झाडांना मिठी मारून महिलांसह लढा देत त्यांनी पर्यावरण वाचवले. त्यांचा विश्वास होता की जंगल हेच ग्रामीण जीवनाचे आणि स्त्रियांच्या जगण्याचे आधार आहेत. साधे जीवन जगत त्यांनी निसर्गाशी एकरूप राहून संघर्ष केला. त्यांच्या कार्यामुळे अनेक ग्रामीण महिलांना आत्मविश्वास मिळाला. विमला बहुगुणा यांचे योगदान पर्यावरण व स्त्रीशक्तीचे प्रेरणादायी उदाहरण ठरते.











# बेगम अख्तर

## गझल सम्राज्ञी

बेगम अख्तर या एक महान भारतीय सुप्रसिद्ध गझल, ठुमरी आणि दादरा गायिका आणि अभिनेत्री होत्या. त्यांना **'मल्लिका-ए-गझल' (गझलची राणी)** म्हणून ओळखले जाते. त्यांनी गझल, दादरा आणि ठुमरी गायनशैलीत मोठे यश मिळवले आणि संगीताला उच्च दर्जावर नेले. त्यांच्या सुमधुर आवाजाने संपूर्ण देश मंत्रमुग्ध झाला. त्या काळात महिलांसाठी गाण्याची वाट कठीण होती, पण अनेक अडथळ्यांवर मात करत त्यांनी ती पार केली. संघर्षातून त्यांनी संगीत क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण केले. त्यांच्या गायकीत वेदना आणि सौंदर्य यांचा अद्भुत संगम होता. आपल्या प्रभावी आवाजाने आणि संगीतातील योगदानाने बेगम अख्तर आजही एक प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत आणि त्यांची 'मल्लिका-ए-गझल' ही ओळख अजरामर आहे.

# इंदिरा गांधी

## भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान







इंदिरा गांधी या भारताच्या पहिल्या आणि आजपर्यंतच्या एकमेव महिला पंतप्रधान आहेत. त्यांच्या कठोर निर्णयक्षमतेमुळे त्यांना **‘पोलादी महिला’** म्हणून ओळखले जाते. त्यांनी ‘गरिबी हटाव’चा नारा देत सामाजिक न्यायासाठी पावले उचलली. बांगलादेश मुक्ती संग्रामात त्यांच्या नेतृत्वाची निर्णायक भूमिका होती. त्यांच्या काळात भारताने अणुशक्ती संपन्न राष्ट्र म्हणून स्थान मिळवले. हरित क्रांतीमुळे देशातील अन्नधान्य उत्पादनात मोठी वाढ झाली. त्यांनी भारताचे परराष्ट्र धोरण मजबूत करून जागतिक स्तरावर देशाची प्रतिमा उंचावली. महिला नेतृत्व कसे असावे याचा आदर्श त्यांनी घालून दिला. देशहिताला प्राधान्य देत त्यांनी आव्हानांचा निर्भयपणे सामना केला. त्यांचे कार्य, धैर्य आणि दूरदृष्टी आजही भारतीय जनतेला आणि विशेषतः महिलांना प्रेरणा देतात.



# डॉ.आनंदीबाई जोशी

## पहिल्या भारतीय महिला डॉक्टर




आनंदीबाई जोशी या महाराष्ट्रातील पहिल्या भारतीय महिला डॉक्टर होत्या. जन्म 1865 मधला. भारतात स्त्रियांनी उच्च शिक्षण घेणे ज्या काळात अशक्य होते त्या काळात त्यांनी अमेरिकेत जाऊन शिक्षण घेण्याचे धाडस केले. समाजातील विरोध असूनही त्यांनी हार मानली नाही. लहान वयातच त्यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले. त्या काळात स्त्रियांसाठी शिक्षण घेणे फार कठीण होते. अमेरिकेत जाऊन त्यांनी वैद्यकीय अभ्यास पूर्ण केला. त्यांनी महिलांसाठी आरोग्यसेवा आणि शिक्षणाचे नवे आदर्श निर्माण केले. त्यांचे आयुष्य मेहनत, धैर्य आणि चिकाटीचे प्रतीक आहे. आजही आनंदीबाई जोशी मुलींसाठी प्रेरणास्थान आहेत. कष्टाच्या आणि जिद्दीच्या जोरावर अभ्यासक्रम दोनच वर्षांत पूर्ण करून मार्च इ.स. 1886 मध्ये आनंदीबाईंनी एम.डी. ही पदवी मिळवली. ‘चूल आणि मूल’ म्हणजेच आयुष्य असे समजणाऱ्या महिलांना त्या काळात आनंदीबाई जोशी यांनी आदर्श व मानदंड घालून दिला.

# भुरी बाई




## आदिवासी कलेची ओळख



भुरी बाई या मध्य प्रदेशातील प्रसिद्ध भिल्ल आदिवासी कलाकार होत्या. बालपणी मजुरी करत मोठ्या झालेल्या भुरीबाईंनी भिंतीवर चित्रं काढण्यापासून आपल्या कलेचा प्रवास सुरू केला. त्यांची चित्रकला ही भिल्ल परंपरेतील लोककथा, निसर्ग आणि दैनंदिन जीवन यांचं जिवंत दर्शन घडवते. साध्या मातीच्या भिंतीवर सुरू झालेली त्यांची कला आज जगभरातील आर्ट गॅलरीत पोहोचली आहे. त्या **'पिथोरा'** चित्रकलेसाठी प्रसिद्ध होत्या. त्यांनी या परंपरेला आधुनिक रंग आणि माध्यमांमध्ये आणले, ज्यामुळे त्यांना समकालीन भारतीय कलेत महत्त्वाचे स्थान मिळाले. कठीण परिस्थितीतही त्यांनी कलेला धरून ठेवलं आणि आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली. 2021 मध्ये भारत सरकारने त्यांना पद्मश्री पुरस्काराने गौरवलं. भुरी बाई या स्त्रियांसाठी आणि कलाकारांसाठी प्रेरणादायी आदर्श ठरल्या आहेत.




# कुमुद पावडे





## पहिली दलित महिला संस्कृत प्राध्यापिका

कुमुद पावडे या भारताच्या पहिल्या दलित महिला संस्कृत प्राध्यापिका होत्या. समाजातील विरोध, बहिष्कार आणि अपमान सहन करूनही त्यांनी शिक्षणाची वाट धरली. संस्कृतसारख्या विषयात स्थान मिळवून त्यांनी प्रस्थापित व्यवस्थेला आव्हान दिलं. त्यांचे **‘अंतःस्फोट’** हे आत्मचरित्र दलित स्त्रियांच्या संघर्षाचं ज्वलंत उदाहरण आहे. ज्ञान, जिद्द आणि धैर्याच्या जोरावर त्यांनी पुढील पिढ्यांसाठी प्रेरणेचा दीप प्रज्वलित केला. एकदा त्यांनी सांगितले होते की, **मी जेव्हा संस्कृत वर्गात बसले, तेव्हा माझ्या उपस्थितीलाच पाप मानलं गेलं, पण मी हार मानली नाही.** त्यांनी स्त्रीवाद, समता आणि सामाजिक न्याय यासाठीही लेखणी आणि वक्तृत्वाने लढा दिला. कुमुद पावडे यांचं आयुष्य हे अन्यायाविरुद्धच्या विद्रोहाचं आणि आत्मविश्वासाचं प्रतीक आहे.










# महाश्वेता देवी

## जनतेची लेखिका



महाश्वेता देवी या सुप्रसिद्ध लेखिका आणि सामाजिक कार्यकर्त्या होत्या. मात्र, त्या फक्त लेखिका नव्हत्या तर चळवळीच्या कार्यकर्त्या होत्या. त्यांच्या लिखाणात आणि सामाजिक कार्यात भारतातील आदिवासी आणि दलित लोकांच्या समस्या, त्यांचे कष्ट आणि त्यांच्या हक्कांसाठीचा संघर्ष दिसून येतो. त्यांनी आदिवासी आणि वंचित समाजाच्या जीवनावर लेखन केले. त्यांच्या कादंबऱ्यांतून अन्यायाविरुद्ध आवाज उठवला. त्यांच्या **‘झाशीची राणी’** आणि **‘हजार चुरासिर माँ’**सारख्या साहित्यकृती अमर ठरल्या. त्यांनी दुर्लक्षित समाजासाठी आयुष्य झोकून दिले. सत्य आणि न्यायासाठी त्यांची लेखणी शस्त्रासारखी काम करत होती. महाश्वेता देवी आजही संघर्ष आणि प्रेरणेचे प्रतीक आहेत. भारतीय साहित्य क्षेत्रातील ज्ञानपीठ पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. त्यांना साहित्य अकादमी पुरस्कार, रॅमन मॅगसेसे पुरस्कार आणि ज्ञानपीठ पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे.



# लीला सेठ

## पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश








लीला सेठ या भारतातील दिल्ली उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश होत्या. त्यांनी न्यायव्यवस्थेत उच्च स्थान मिळवले. भारतातील कायदेशीर बाबींच्या जगात, न्यायमूर्ती लीला सेठ यांनी अनेक काचेच्या मर्यादा तोडल्या आहेत. महिलांच्या अधिकारांसाठी त्यांनी महत्त्वाचे निर्णय दिले. 2012 मध्ये दिल्लीत 16 डिसेंबर रोजी झालेल्या क्रूर सामूहिक बलात्कारानंतर स्थापन करण्यात आलेल्या न्यायमूर्ती वर्मा समितीच्या त्या सदस्य होत्या. त्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला न्यायाधीश तर होत्याच शिवाय त्या 1991 मध्ये राज्य उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीशही बनल्या. 1997 ते 2000 पर्यंत त्या भारतीय कायदा आयोगाच्या सक्रिय सदस्य होत्या. मुलींना समान मालमत्ता हक्क देणाऱ्या हिंदू उत्तराधिकार कायद्यात सुधारणा याच काळात करण्यात आल्या. त्यांच्या कार्यामुळे भारतीय न्यायव्यवस्थेला संवेदनशीलता आणि न्यायाची नवी दिशा मिळाली. त्यांचे आयुष्य धैर्य, प्रामाणिकपणा आणि दूरदृष्टीचे प्रतीक आहे. त्या आजही तरुण वकील आणि महिलांसाठी प्रेरणादायी आदर्श आहेत.



# मेरी कोम




## भारताची वाघिण

मेरी कोम या भारताच्या सर्वात यशस्वी बॉक्सिंग खेळाडूंपैकी एक असून त्यांना **'मॅग्निफिसेंट मेरी'** म्हणून जगभरात ओळखले जाते. मणिपूरसारख्या छोट्या राज्यातून येऊनही त्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावर आपली छाप सोडली. सहा वेळा विश्वविजेतेपद मिळवून त्यांनी इतिहास रचला. 2012 च्या लंडन ऑलिम्पिकमध्ये त्यांनी कांस्य पदक जिंकून भारताचा गौरव वाढवला. लग्न व मातृत्वानंतरही त्यांनी क्रीडा क्षेत्रात पुनरागमन करून विजय मिळवला, ज्यामुळे त्यांची जिद्द आणि चिकाटी अधोरेखित झाली. गरिबी, संघर्ष आणि समाजातील अडथळे पार करून त्यांनी महिलांना नवी दिशा दिली. त्यांचे जीवन हे मेहनत, आत्मविश्वास आणि धैर्याचे मूर्तिमंत उदाहरण आहे. **'स्वप्नं मोठी बाळगा आणि त्यासाठी लढा'** हा त्यांचा संदेश प्रत्येक तरुणाईला प्रेरणा देतो. त्यांना पद्मभूषण, पद्मविभूषण आणि राज्यसभा सदस्यपदासारख्या गौरवांनी सन्मानित करण्यात आले. मेरी कोम यांनी अनेक सामाजिक मापदंडांना आव्हान देत तरुण पिढीला, विशेषतः महिलांना आपली स्वप्ने पूर्ण करण्याची प्रेरणा दिली आहे. मेरी कोमचा प्रवास हा केवळ तिच्या खेळातील कौशल्याचा नाही, तर तिच्या धैर्याचा, मेहनतीचा आणि कधीही हार न मानणाऱ्या वृत्तीचा आहे.

